**संध्याकाळ**

उदासवाणा एकटेपणा
शोधीत फिरतो बापुडवाणा
कातरलेल्या शून्य मनाला
कशा साहवी सांज वेणा

नवीन जत्रा नवा पाळणा
निरुद्देश मी मूक पाहुणा
गडबड कोलाहलात हरवलो
खेळ संपेना जीवघेणा

गळला  देह गळे मीपणा
कसा सोडवू गूढ उखाणा
जन्म -मृत्युच्या हिंदोळ्यावर
पुन्हा शोधतो पाउल-खुणा

**-------संध्या रानडे**